मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२३। पान १


# रोहित पवार यांची पुणे ते नागपूर 'युवा संघर्ष यात्रा'

## ८०० किलोमीटर, ४५ दिवसाचा प्रवास, १३ जिल्हे, दररोज २५ किमीचा प्रवास

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** एकीकडे आगामी निवडणुकांचा दृष्टीने सर्वच पक्षांकडून मोर्चेबांधणी केली जात असून राजकीय पक्षाकडून दौरे, पदयात्रा सुरु आहेत. यंदाच्या निवडणुकांत युवांचा आवाज घुमणार असल्याने आमदार रोहित पवार यांनी युवकांच्या प्रश्नांना हात घालत तब्बल ८०० किलोमीटरच्या युवा संघर्ष यात्रेचे आयोजन केले आहे. कंत्राटी भरती, पेपरफुटी आदीसंह विविध प्रश्नांवर या यात्रदरम्यान विचारमंथन करण्यात येणार असल्याची माहिती आमदार रोहित पवार यांनी पिंपरी येथे पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पत्रकार परिषदेला ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे, पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तुषार कामठे रविकांत वर्पे, माजी नगरसेविका सुलक्षणा शीलवंत, माजी नगरसेवक गणेश भोंडवे, शिरीष जाधव, सागर तापकीर आदी उपस्थित होते. आमदार रोहित पवार येत्या २४ ऑक्टोबरपासून युवा संघर्ष यात्रा काढणार आहे. ही यात्रा ८०० किलोमीटरची पदयात्रा असून तब्बल १३ जिल्ह्यातून प्रवास करणार आहे. विजयादशमीच्या दुसऱ्या दिवशी पुण्यातून युवा संघर्ष यात्रेला सुरवात होणार असून ४५ दिवसांचा प्रवास करून ७ डिसेंबर रोजी नागपूरला याची सांगता होईल. पुण्यातील महात्मा फुले वाडा येथून या यात्रेला सुरवात होणार आहे. त्यांनतर वढू तुळापूर येथे नतमस्तक होऊन, यात्रेचा शुभारंभ होईल. संतांच्या, महाराजांच्या भूमीतून यात्रा जाणार असून दररोज कमीत कमी १७ आणि जास्तीत जास्त २५ किमी असा पायी प्रवास असणार आहे. या पदयात्रेचा एक भाग म्हणून, आमदार रोहित पवार इतर असंख्य युवांसोबत पुणे ते नागपूर अशी पदयात्रा करतील आणि राज्यातील तरुण-तरुणींना भेडसावणाऱ्या विविध समस्या सोडवण्यासाठी जनतेशी संवाद साधतील. संपूर्ण पदयात्रेदरम्यान, युवांना त्यांची मतं आणि अपेक्षा व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. याबाबत माहिती देताना रोहित पवार म्हणाले की, 'युवा संघर्ष यात्रा' ही युवांच्या नेतृत्वाखालील एक चळवळ आहे, ज्याचा मूळ उद्देश महाराष्ट्रातील युवांना भेडसावणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी जनसमर्थन एकत्रित करणे आणि युवा वर्गाचा आवाज शासनापर्यंत पोहचवणे हा आहे. आज युवा म्हणून संवाद साधत आहे. ज्या दिवसापासून राजकारणात आलो, तेंव्हापासून युवांचे प्रश्न मांडणे अन त्यांच्या अडचणी सोडवण्याचे प्रयत्न करत आलो आहे. मतदारसंघा प्रमाणेच युवांच्या प्रश्नांना ही प्राधान्य मांडले आहे. कंत्राटी भरती, पेपरफुटी, शाळा दत्तक देण्याचा निर्णय आदी प्रश्नावर आवाज उठवला जाणार आहे. त्याचबरोबर आजच्या राजकारणाची परिस्थिती पाहता युवा नेत्यांनी राजकारणात आलो ही चूक झाली का? किंवा नव्या पिढीने राजकारणात यावं की नाही? असा प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.



### असा असणार यात्रेचा प्रवास...

» राष्ट्रवादी शरद गटाचे आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून युवा संघर्ष यात्रेला येत्या २४ ऑक्टोबर रोजी सुरुवात होणार आहे. पुण्यातून या यात्रेला सुरुवात होईल. पुणे ते नागपूर असा हा ८०० किलोमीटरचा प्रवास असणार आहे. एकूण ४५ दिवसांचा प्रवास असून पुण्यातील तुळापूर येथून या यात्रेला सुरुवात होणार आहे. काष्टी, कर्जत, पाटोदा, बीड, जातेगाव, पिंपळगाव, कुंभार, परतुर, जिंतूर, सेनगाव, वनोजा, वाशिम, कारंजा, पापळ, पुलगाव, सेवाग्राम, बाजार गाव, नागपूर येथे या युवा संघर्ष यात्रेचा समारोप ७ डिसेंबर रोजी होणार आहे.

# नागरिकांनी सुचविलेल्या कामाचा समावेश अर्थसंकल्पात होणार

## १० नोव्हेंबरपर्यंत सूचना अर्ज स्विकारण्यात येणार

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड महापालिका ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य महापालिका आहे. महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या नागरिकांच्या सुविधांसाठी महानगरपालिकेने पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात नागरिकांनी सुचविलेल्या कामाचा समावेश करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. २०२४-२५ च्या अंदाजपत्रकासाठी नागरिकांकडून सूचना अर्ज १० नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्विकारण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. सन २००७ पासून महापालिकेचे अंदाजपत्रक तयार करताना नागरिकांच्या सुचनेनुसार आवश्यक कामांचा अंतर्भाव अंदाजपत्रकात करणे, असा उपक्रम महापालिका राबवते. त्यासाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी करून नागरिकांना कामे सुचविणेबाबत जाहिर आवाहनही करण्यात येते. आपल्या परिसराच्या गरजेनुसार आवश्यक व योग्य कामांचा



समावेश अंदाजपत्रकात करण्यासाठी नागरिक सूचना करू शकतात. त्यासाठी विहीत नमुन्यातील नागरिक सूचना अर्ज प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये विनामुल्य वाटपाकरीता उपलब्ध असतील तसेच म.न.पा. वेबसाईटवर देखील नागरिकांचे सूचना अर्ज दि. १० नोव्हेंबर २०२३ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत संबंधित क्षेत्रिय कार्यालयात तमेच ई-मेलवरही स्वीकारण्यात येतील. संबंधित क्षेत्रिय अधिकारी व कार्यकारी अभियंता हे सुचविलेल्या कामांची शहानिशा करून योग्य असलेल्या विकास कामांचा समावेश अर्थसंकल्पात करतील. महापालिकेच्या वतीने नागरिकांनी सुचना अर्ज २०२४ – २०२५ भरताना घ्यावयाच्या काळजी बाबतही सूचना देण्यात आल्या आहेत ज्यामध्ये सूचना अर्जात कामे सुचविताना जसे पूल, उड्डाणपुल, नवे रस्ते, भवन बांधकाम इ. मोठी कामे सुचवू नयेत. या उपक्रमात काम सुचविण्याची मर्यादा ही केवळ १० लाखाची आहे याची नोंद घ्यावी. तसेच सुप्रिम कोटीने अवैध ठरविलेली कामे करण्याबाबतच्या सूचना महानगरपालिकेला स्वीकारता येणार नाहीत, नागरिक सूचना मध्ये कामाचे स्वरुप व स्थान अचूकपणे लिहावे. नागरिकांनी सूचना अर्जातील कोष्टक १ आणि २ नुसार कामाचा सांकेतिक क्रमांक नमूद करावा.

# 'प्रधानमंत्री आवास'चा लॅकी ड्रॉ काढून लाभार्थींना घरांचा ताबा द्या!

## आमदार महेश लांडगे यांची महापालिका प्रशासनाला सूचना

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी आणि आकुर्डी येथे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सदनिका बांधून पूर्ण झाल्या आहेत. मात्र, 'लकी ड्रॉ' न काढल्याने लाभार्थ्यांना अद्याप घरांचा ताबा मिळाला नाही. सुमारे ११ हजार नागरिकांनी अर्ज केले आहेत. त्यांचे लक्ष या सोडतीकडे आहे. त्यामुळे त्वरीत कार्यवाही करून 'लकी ड्रॉ' काढावा, अशी सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, 'सर्वांसाठी घर' या संकल्पनेतून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'प्रधानमंत्री आवास योजना' राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत महापालिकेमार्फत पिंपरी, आकुर्डीत बांधलेल्या ९३८ घरांसाठी अर्ज मागविले आहेत. १० हजार रुपये अनामत रक्कम व ५०० रुपये नोंदणी शुल्कासह इच्छुक नागरिकांनी अर्ज केले आहेत.





रस्ते आरक्षणामध्ये बाधित झालेल्या नागरिकांसाठी आकुर्डी येथील गृहप्रकल्प राखीव ठेवला होता. आकुर्डीत ५६८ सदनिका आणि पिंपरीत ३७० सदनिका एक वर्षापासून बांधून तयार आहेत. मात्र, प्रशासनाने या प्रकल्पांसाठी अद्याप 'लकी ड्रॉ' राबवलेली नाही. पिंपरीतील सदनिकेसाठी पात्र लाभार्थ्यास सात लाख ९२ हजार रुपये, आकुर्डीतील सदनिकेसाठी सात लाख ३५ हजार २५५ रुपये स्वहिस्सा भरावा लागणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पिंपरीतील प्रकल्पासाठी ४ हजार ६४६ अर्ज, आकुर्डी प्रकल्पासाठी ६ हजार ६९२ अर्ज असे एकूण १० हजार ११३ अर्ज प्रशासनाकडे दाखल झाले आहेत. या अर्जातून ९३८ लाभार्थींना घर मिळणार आहे. 'प्रधानमंत्री आवास' योजना अर्जाची छाननी करून तात्काळ 'लकी ड्रॉ' काढणे अपेक्षीत आहे. सदर प्रकल्पाचे काम वर्षभरापूर्वीच पूर्ण झाले आहे. त्याची 'लकी ड्रॉ' लवकर काढल्यास डिसेंबरअखेर सदनिका ताब्यात मिळतील.

> **"देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वांसाठी घर या संकल्पनेतून प्रधानमंत्री आवास योजना देशभरात सक्षमपणे राबवली आहे. या योजनेच्या माध्यमातून केंद्र, राज्य सरकार, पीएमआरडीए आणि पीसीएमसीच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे १९ हजार घरांची निर्मिती होत आहे, ही निश्चितच समाधानाची बाब आहे. पिंपरी आणि आकुर्डी येथील प्रकल्पाचे काम वर्षभरापूर्वीच पूर्ण झाले आहे. आता डिसेंबरपर्यंत लाभार्थी निश्चित करून घरांचा ताबा संबंधितांना द्यावा. ज्यामुळे नवीन वर्षामध्ये त्या नागरिकांना हक्काच्या घरात प्रवेश करता येईल. याबाबत प्रशासन सक्षमपणे कार्यवाही करेल, अशी अपेक्षा आहे.**
>
> **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# मराठा समाजाबद्दल अवमानकारक वक्तव्य!

## छगन भुजबळ यांना कायदेशीर नोटीस

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** न्याय आणि हक्कासाठी लाखो मराठा समाज बांधव रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहे. जीवाची पर्वा न करता अनेक सहकारी आंदोलनात शहीद झाले. मराठा समाज बांधवांच्या वेदना कमी करण्याऐवजी बेताल वक्तव्य करून भावना दुखावल्या जात आहेत. समाजाची कुचेष्टा करणारे वक्तव्य केल्याबद्दल त्वरित माफी मागा अन्यथा कायदेशीर लढाईला सामोरे जा असा इशारा मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते सतीश काळे यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना दिला आहे. मराठा समाजाबद्दल खोटे व अवमानकारक वक्तव्य केल्याबद्दल तसेच मराठा आणि ओबीसी समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्य केल्याबद्दल काळे यांनी मंत्री भुजबळ यांना वकिलांमार्फत नोटीस पाठवली आहे. या नोटीसद्वारे मंत्री भुजबळांना इशारा देण्यात आला आहे.

सतीश काळे यांच्या वतीने ॲडव्होकेट अतुल पाटील यांनी पाठवलेला नोटीस मध्ये नमूद करण्यात आले आहे की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मराठा



क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते सतीश काळे यांनी शहरात आमरण उपोषण केले होते. उपोषणाने तब्येत खालावल्याने त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. समाज बांधवांना न्याय मिळावा यासाठी हे आंदोलन सुरू आहे. मात्र महाराष्ट्र सरकारच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या मंत्री या पदावर काम करताना या प्रश्नाबाबत छगन भुजबळ गंभीर नाहीत. मराठा समाज बांधवांचे आंदोलन कोणत्याही जातीच्या किंवा व्यक्तीच्या विरुद्ध नाही. तरी देखील गेल्या काही दिवसांपासुन मंत्री भुजबळ हे मराठा आणि ओबीसी या दोन समूहात तेढ निर्माण होईल, अशी वक्तव्ये करत आहेत. १४ ऑक्टोबर रोजी अंतरवली सराटी, येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाजाच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदरची सभा ही कोणत्याही पक्षाने अथवा नेत्याने आयोजित केलेली नाही. या सभेसाठी कोणीही कसलीही वर्गणी मागितली नसुन कोणतेही प्रायोजकत्व घेतलेले नाही. ही बाब संपुर्ण राज्याला माहित असताना देखील या सभेबद्दल कुचेष्टा करणारी व मराठा समाजाच्या भावना दुखावणारी वक्तव्ये मंत्री भुजबळ यांनी केली आहेत.

त्यामुळे कुचेष्टा करणारी व समस्त मराठा समाजाच्या भावना दुखावणारी केलेली वक्तव्ये त्वरित मागे घेऊन सकल मराठा समाजाची माफी मागावी,अशी मागणी सतीश काळे यांचे कायदेशीर सल्लागार ॲडव्होकेट अतुल पाटील यांनी नोटिसद्वारे केली आहे. अन्यथा कायदेशीर कारवाईची करू, असे आवाहन काळे यांनी नोटिसद्वारे केले आहे.

# मेट्रो प्रकल्पाचा खर्च २ हजार कोटींनी वाढला!

## केंद्रीय मंत्र्यांच्या आढावा बैठकीत तीनच आमदार उपस्थित

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मेट्रो स्टेशनच्या जागेत करावे लागलेले बदल, कोरोनामुळे झालेला विलंब आणि भूसंपादनाचा वाढलेला खर्च यामुळे मेट्रो प्रकल्पाच्या खर्चात जवळपास दोन हजार कोटी रुपयांनी वाढ झाली आहे'', अशी माहिती परराष्ट्र राज्यमंत्री व्ही. मुरलीधरन यांनी मंगळवारी दिली. दरम्यान, महामेट्रोने हाती घेतलेले दोन्ही मेट्रोमार्ग मार्च २०२४ पर्यंत पूर्ण होतील, असा दावाही त्यांनी केला. जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची (दिशा) बैठक व्ही. मुरलीधरन यांच्या उपस्थित आज झाली. त्यानंतर पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. या वेळी जिल्हाधिकारी डॉ. राजेश




देशमुख, आमदार भीमराव तापकीर, संजय जगताप आणि रवींद्र धंगेकर उपस्थित होते. १७ खात्यांच्या सुमारे ४१ योजनांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. पुणे शहर व परिसरात पायाभूत सुविधांची कामे गतीने सुरू आहेत. त्यामुळे पुणे शहर हे देशासाठी विकासाचे मॉडेल ठरणार आहे, असा विश्वास मुरलीधरन यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, ''पुणे शहरात वनाज ते रामवाडी मेट्रो प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. स्वारगेट येथील मेट्रो स्टेशनचे काम पूर्णत्वास आले आहे. मार्च २०२४ पर्यंत मेट्रो प्रकल्पाचे काम पूर्ण होईल. मेट्रो प्रकल्पासाठी सुमारे ११ हजार ४२० कोटी रुपये खर्च अपेक्षित धरला होता. परंतु खर्चात वाढ होऊन १३ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च होईल. वाढीव खर्चास मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. पालखी मार्ग, पुणे-मिरज रेल्वे मार्ग, अमृत योजना, स्मार्ट सिटी योजना यांचाही या बैठकीत आढावा घेण्यात आला असल्याचे सांगून मुरलीधरन म्हणाले, ''लोहगाव विमानतळ विस्तारीकरणाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. लवकरच त्यांच्या उद्घाटनाची तारीख निश्चित करण्यात येईल. केंद्र आणि राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी योजनांचा आढावा दिशा समितीच्या बैठकीत घेतला जातो. यापूर्वी समितीच्या नियमित बैठका होत होत्या. यंदा प्रथमच दीड वर्षानंतर समितीची बैठक झाली. यात जिल्ह्यातील २१ पैकी केवळ तीनच आमदार उपस्थित होते. त्यामध्ये भाजपचे एक तर काँग्रेसच्या दोन आमदारांचा समावेश होता. पुणे शहरातील एकही खासदार या बैठकीला हजर नव्हते. याबाबत मुरलीधरन यांना विचारले असता, त्यांनी यावर उत्तर देणे टाळले. शहर व जिल्ह्यातील महत्वकांक्षी प्रकल्प आणि योजना मार्गी लावण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची असताना भाजपसह सर्वच पक्षांच्या आमदार आणि खासदारांच्या गैरहजेरीची चर्चा बैठकीनंतर रंगली.

### खर्चास मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू

» पुणे शहर व परिसरात पायाभूत सुविधांची कामे गतीने सुरू आहेत. त्यामुळे पुणे शहर हे देशासाठी विकासाचे मॉडेल ठरणार आहे, असा विश्वास मुरलीधरन यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, ''पुणे शहरात वनाज ते रामवाडी मेट्रो प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. स्वारगेट येथील मेट्रो स्टेशनचे काम पूर्णत्वास आले आहे. मार्च २०२४ पर्यंत मेट्रो प्रकल्पाचे काम पूर्ण होईल. मेट्रो प्रकल्पासाठी सुमारे ११ हजार ४२० कोटी रुपये खर्च अपेक्षित धरला होता. परंतु खर्चात वाढ होऊन १३ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च होईल. वाढीव खर्चास मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# जनरल मोटर्स कामगारांच्या पाठिशी शासन ठामपणे उभे राहील!

## वाढीव भरपाई देण्याबाबत जनरल मोटर्सला मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मावळ तालुक्यातील जनरल मोटर्सच्या बंद झालेल्या प्रकल्पातील कामगारांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे राहील. तसेच हा प्रकल्प घेणाऱ्या ह्युंदाई कंपनीकडे रोजगार संधीसाठी पाठपुरावा केला जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितले. जनरल मोटर्सचा हा प्रकल्प ह्युंदाई कंपनीने खरेदी केला आहे. यातील कामगारांना जनरल मोटर्सने समाधानकारक भरपाई द्यावी, तसेच काही कामगारांना ह्युंदाई कंपनीने सेवेत सामावून घ्यावे या मागणीसाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या



अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले. वर्षा शासकीय निवासस्थानी झालेल्या या बैठकीस उद्योग मंत्री उदय सामंत, कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे, खासदार श्रीरंग बारणे, मावळचे आमदार सुनील शेळके, माजी मंत्री संजय तथा बाळा भेगडे, कामगार विभागाच प्रधान सचिव विनीता वेद-सिंघल, उद्योग विभागा प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा तसेच जनरल मोटर्स कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, कामगार संघटनेचे पदाधिकारी, कामगार आदी उपस्थित होते. कामगारापकी सुमारे ६९६ कामगाराना भरपाईचा रक्कम स्वीकारून स्वेच्छेने काम सोडल्याची माहिती यावेळी देण्यात आली. उर्वरित कामगारांची वाढीव भरपाई तर काहींची ह्युंदाईने सेवेत घ्यावी, अशी मागणी आहे. त्यावर उर्वरित कामगारांच्या वाढीव भरपाईच्या मागणीबाबत जनरल मोटर्सच्या व्यवस्थापनाने फेरविचार करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. ह्युंदाई हा प्रकल्प २०२५ मध्ये सुरू करणार आहे. हा प्रकल्प सुरू करण्यासाठी शासन म्हणून त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. हा प्रकल्प देखील मोठ्या रोजगार संधी उपलब्ध करून देणारा आहे. त्यामुळे भरपाई मान्य नसलेल्या आणि कुशल, अर्धकुशल अशा कामगारांना प्राधान्याने सेवेत घ्यावे यासाठी आवश्यक असा पाठपुरावा केला जाईल असेही मुख्यमंत्र्यांनी आश्वस्त केले.

### व्यवस्थापनाने फेरविचार करावा

» कामगारापकी सुमारे ६९६ कामगाराना भरपाईचा रक्कम स्वीकारून स्वेच्छेने काम सोडल्याची माहिती यावेळी देण्यात आली. उर्वरित कामगारांची वाढीव भरपाई तर काहींची ह्युंदाईने सेवेत घ्यावी, अशी मागणी आहे. त्यावर उर्वरित कामगारांच्या वाढीव भरपाईच्या मागणीबाबत जनरल मोटर्सच्या व्यवस्थापनाने फेरविचार करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

# सातबारा उताऱ्यांत बदल करून जमिनी हडप!

## पुणे जिल्ह्यात मावळ, मुळशी या तालुक्यांत जमिनी हडपल्याचे प्रमाण जास्त

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी सातबारा संगणकीकरण या प्रकल्पांतर्गत मूळ सातबारा आणि संगणकीकृत करण्यात आलेला सातबारा उतारा यांमध्ये अनेक ठिकाणी तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे. हा प्रकल्प राबविताना तहसील, तलाठी, मंडल स्तरावर हस्तलिखित सातबाऱ्यावर भोगवटादार म्हणून असलेल्या कुळांची नोंद, कुळांची नावे इतर हक्कात टाकण्यात आले आहे. अनेक ठिकाणी कुळांची नावे काढून टाकण्यात आली आहेत. याबाबत अनेक तक्रारी राज्य शासनाला प्राप्त झाल्या. त्यामुळे शासनाने गेल्या दहा वर्षांत कलम १५५ चा वापर करून दिलेल्या आदेशांची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. पुणे जिल्ह्यात मावळ, मुळशी या दोन तालुक्यांत हे प्रमाण जास्त असल्याचे समोर आले आहे. तहसीलदार स्तरावर कलम १५५ चा वापर करून अनेक ठिकाणी सातबाऱ्यावरील नोंदी, तसेच आकारीपडच्या जमिनींचे शेरे काढणे, वारस नोंदी काढून टाकणे किंवा नव्याने वारस नोंद करणे हे बदल परस्पर करून नवीन सातबारा उतारा अनेकांनी तयार केला आहे. त्यामुळे मूळ सातबारा आणि संगणकीकृत केलेला सातबारा उतारा यामध्ये तफावत येत आहे. महसूल विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना हाताशी धरून हे गैरप्रकार करण्यात आले आहेत.



या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने गेल्या दहा वर्षात दुरुस्ती केलेल्या दाखल्यांची तपासणी करण्याचे आदेश विभागीय आयुक्तांना दिले आहेत. त्यानुसार उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकानिहाय प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र समिती स्थापन करून एक महिन्याच्या आत राज्य शासनाला अहवाल सादर करावा, असे आदेश विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. महसूल विभागांतर्गत सातबारा उताऱ्यावर असणारे शेरे कमी करणे, शर्तीचे शेरे काढणे, कुळकायद्यानुसार दाखल करण्यात आलेले शेरे, आकारीपड, वारस नोंदी, लेखन प्रमादाची दुरुस्ती आदी नोंदी कलम १५५ अंतर्गत आदेश पारीत करण्यात येतात. त्यानुसार अभिलेखामध्ये दाखले देताना अनियमितता आढळून आल्या आहेत.

विभागीय आयुक्त राव यांनी सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर आणि पुणे या पाचही जिल्ह्यांत तालुकानिहाय उप जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षते खाली तहसीलदारांची समिती स्थापन केली आहे. या समितीने एका महिन्याच्या आत संबंधित दाखल्यांची छाननी करून तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

दोन वर्तुळाकार रस्ते, पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो अशा महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे जिल्ह्यातील जमिनींना सोन्याचे भाव आला आहे.

त्याचा फायदा घेत रिअल इस्टेट व्यवसायातील दलालांनी स्थानिकांना पैशांचे आमिष दाखवून एक, दोन गुंठ्यांच्या जमिनी गुंतवणूकदारांना विकल्या आहेत.

परिणामी सन २०१८ मध्ये संगणकीकृत सातबाऱ्याच्या तपासणीमध्ये हवेली, जुन्नर, खेड तालुक्यांमधील एका सातबारा उताऱ्यावर १०० पेक्षा अधिक खातेदारांची नावे असल्याने हे तालुके मागे राहिले होते. तुकडाबंदी कायद्यामुळे एक, दोन गुंठे जागा विकता येत नाही. मात्र, तरीदेखील शहरालगतच्या गावांमध्ये जमिनींचे तुकडे करून मोठ्या प्रमाणात विकण्यात आले आहेत.

परिणामी सातबारा संगणकीकरणाचे काम रखडले होते. सातबारा संगणकीकरण केलेला सातबारा उतारा म्हणजे मूळ सातबारा आणि डिजिटल सातबारा हे एकसारखे असायला हवेत (मिरर इमेज) मात्र, मूळ सातबारा उतारा आणि डिजिटल सातबारा उताऱ्यांमध्ये फरक असल्याचे समोर आले आहे. हा बदल परस्पर करण्यात आला आहे.

> **“शासनाच्या आदेशानुसार विभागीय स्तरावर संबंधित प्रकरणांच्या दाखल्यांची तहसील स्तरावर तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार विभागीय आयुक्तालयाकडून उपजिल्हाधिकारी, तहसील स्तरावर तलाठ्यांनी दिलेल्या १५५ च्या दाखल्यांची तपासणी सुरू केली आहे. महिनाभरात हा अहवाल विभागीय आयुक्तालयाकडे प्राप्त होताच राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.**
> **— रामचंद्र शिंदे,**
> **महसूल उपायुक्त, विभागीय आयुक्तालय**

# ‘ससून’मधील कैदी रुग्णांची सगळी ‘प्रकरणे’ बाहेर येणार!

## चौकशी समितीने हजार रुग्णांचे अहवाल मागविले

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** ससून रुग्णालयातील कैदी पलायनप्रकरणी चौकशी साठी नेमलेल्या समितीकडून रुग्णालयाच्या प्रशासनाची चौकशी सुरू आहे. समितीने २०२० सालापासून आतापर्यंत रुग्णालयात दाखल झालेल्या प्रत्येक कैदी रुग्णाचे अहवाल मागविले आहेत. रुग्णालयात वर्षाला सुमारे अडीचशे कैदी रुग्ण दाखल होतात. त्यामुळे मागील चार वर्षांतील दाखल हजारभर कैदी रुग्णांचे अहवाल बनविण्याचे काम आता ससूनमध्ये सुरू आहे. ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याप्रकरणी राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती नियुक्त केली. या समितीकडून शुक्रवारी (ता.१३) दिवसभर अधिष्ठाता कार्यालयात चौकशीचे सत्र सुरू होते. त्यात अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर, वैद्यकीय अधीक्षक डॉ.



किरणकुमार जाधव, कैदी रुग्ण समितीचे अध्यक्ष डॉ. सुजित धिवारे, कैदी रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर, कैदी कक्ष क्रमांक १६ मधील कर्मचाऱ्यांसह शिपायांची चौकशी केली होती. समितीने २०२० पासून आतापर्यंत ससून रुग्णालयात दाखल झालेल्या कैदी रुग्णांचा अहवाल मागितला आहे. त्यात कैदी रुग्ण, त्यांचा आजार, उपचार, रुग्णालयात दाखल असलेला कालावधी, उपचार करणारे डॉक्टर आदी माहितीचा समावेश आहे. ससूनमध्ये वर्षभरात सुमारे अडीचशे कैदी रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. मागील चार वर्षांतील सुमारे हजारभर रुग्णांचे अहवाल समितीसमोर सादर करावे लागणार आहेत. हे अहवाल बनविण्याचे काम ससून प्रशासनाकडून सुरू आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत हे अहवाल समितीला सादर करण्यात येतील, असे सूत्रांनी सांगितले. चौकशी समितीसमोर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कनिष्ठ अधिकाऱ्यांवर खापर फोडण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची चर्चा ससूनमध्ये सध्या सुरू आहे. या प्रकरणी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हात झटकण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे समितीकडून नेमकी कारवाई कोणावर होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.